।। सा विद्या या विमुक्तये ।।
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
"ज्ञानतीर्थ" परिसर, विष्णुपूरी, नांदेड - ४३१६०६ (महाराष्ट्र)
SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY NANDED
"Dnyanteerth", Vishnupuri, Nanded - 431606 Maharashtra State (INDIA)
Established on 17th September 1994 – Recognized by the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with 'A' Grade

## Office of the Controller of Examinations

Phone: (02462)229294 website: srtmun.ac.in E-mail: srtmuncoe@gmail.com
FAX No: (02462) 229520

संदर्भ: पनिका/हि-१६-परीक्षा/२०१६-१७/१८९ दि. १२.०९.२०१६

<u>**अति महत्वाचे / परीक्षा प्राधान्य**</u>

प्रति,
**मा.प्राचार्य**
सर्व संलग्नित महाविद्यालये,
प्रस्तुत विद्यापीठ.

<u>**विषय :- हिवाळी-२०१६ परीक्षेच्या पुर्वतयारी व प्रशिक्षणपर बैठकी बाबत.**</u>
संदर्भ :- या कार्यालयाचे परिपत्रक क्र. पनिका/हि-१६-परीक्षा/२०१६-१७/१८२ दि. १०.०९.२०१६.

महोदय,

वरील विषयी आपणास कळविण्यात येते की, प्रस्तुत विद्यापीठाच्या पदवी अभ्यासक्रमाच्या परीक्षा दि.०६.१०.२०१६ व १०.११.२०१६ पासून तर पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षा दि.०४.११.२०१६ व १०.११.२०१६ पासून शैक्षणिक वेळापत्रक २०१६-१७ प्रमाणे सुरु होत आहेत. तसेच संदर्भिय परिपत्रान्वये सविस्तर तारखा व वेळापत्रक विद्यापीठ संकेतस्थळावर जाहिर करण्यात आलेले आहे.

उन्हाळी-२०१६ परीक्षेप्रमाणेच हिवाळी-२०१६ परीक्षेसाठी परीक्षा केंद्र देण्यात आलेले आहेत. अतिरिक्त परीक्षा केंद्र दिल्यास स्वतंत्ररित्या कळविण्यात येईल. हिवाळी-२०१६ परीक्षेसाठी सर्व अभ्यासक्रमाच्या प्रश्नपत्रिका Online (e-Delivery) पध्दतीने पाठविण्यात येणार आहेत. त्यामुळे Online e-Delivery साठी आवश्यक त्या सोई सुविधा जसे की, Computer/Laptop, Internet, Xerox, Fax, Webcam, Power Backup, Data Card इत्यादी सहित्यांची उपलब्धता संबंधित प्राचार्यांनी त्वरीत करणे बंधनकारक आहे.

प्राचार्य/केंद्रप्रमुख यांना सुचित करण्यात येते की, परीक्षा केंद्रावर संबधित प्राचार्य हेच केंद्रप्रमुख असणे अनिवार्य आहे. अपवादात्मक परिस्थीतीत दुस-या प्राध्यापकाची केंद्रप्रमुख म्हणून नियमाप्रमाणे नियुक्ती केल्यास त्यांचे संपुर्ण नाव,भ्रमणध्वनी क्र, दुरध्वनी क्र.,फॅक्स क्र.,ई-मेल इत्यादी माहिती तसेच महाविद्यालयस्तरावर मुल्यांकन कार्यसाठी महाविद्यालयीन मुल्यांकन अधिकारी (College Cap Officer) यांचे संपुर्ण नाव,भ्रमणध्वनी क्र,दुरध्वनी क्र,फॅक्स क्र, ई-मेल याची माहिती परीक्षा विभागास कळविण्यात यावी.

हिवाळी-२०१६ पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या परीक्षा सुरळित पार पाडण्याच्या दृष्टिकोनातुन केंद्रप्रमुख, महाविद्यालयीन मुल्यांकन अधिकारी व संबंधित कर्मचारी यांना Online Question Paper Delivery (e-delivery) व मुल्यांकन प्रक्रिया यासाठी खालील जिल्हानिहाय तारखांना प्रस्तुत विद्यापीठाच्या अधिसभागृहात प्रशिक्षणपर मार्गदर्शन बैठकीचे आयोजन करण्यात आलेले आहे. तरी सदर बैठकीस संबंधित प्राचार्य/केंद्रप्रमुख व संबंधित कर्मचारी यांना उपस्थित राहणेबाबत आदेशित करावे. यासाठी देय असलेला प्रवास व दैनंदिन भत्ता खर्च महाविद्यालयाने करावा. कृपया उपरोक्त प्रमाणे कार्यवाही करण्यात यावी. हि विनंती.

| अ.क्र. | दिनांक | जिल्हा | वेळ |
|---|---|---|---|
| १ | २६.०९.२०१६ | हिंगोली<br>परभणी | सकाळी ११:०० वा |
| २ | २७.०९.२०१६ | नांदेड | सकाळी ११:०० वा |
| | | लातुर | दुपारी ०३:०० वा |

कळावे,

आपला,

**परीक्षा नियंत्रक**

**<u>प्रतिलिपी माहितीस्तव :-</u>**

१. मा.कुलगुरु महोदय, प्रस्तुत विद्यापीठ.
२. मा.प्र-कुलगुरु महोदय, प्रस्तुत विद्यापीठ.